जिल्हा परिषद कोटयातुन पदोन्नत उपविभागीय अभियंता (पदवीधर) (स्थापत्य) व उपविभागीय अधिकारी (पदविकाधारक) (स्थापत्य) या संवर्गाची दिनांक १.१.२०१७ रोजीच्या अंतिम ज्येष्ठतासूचीमध्ये सुधारणा प्रसिध्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन परिपत्रक क्रमांक :- एसएलएस-२०११/(३४३/११)/आ(वर्ग-२)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक :- २४ मे, २०१८

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठता-२०१७/(९३/१७)/आ(वर्ग-२), दि.१२ ऑक्टोंबर, २०१७
२) ग्राम विकास विभागाचे आदेश क्रमांक जिपअ-२०१८/ प्र.क्र.२२/ आस्था-४, दि. ९ मे, २०१८

परिपत्रक

श्री.धर्मेंद्रकुमार ब. बेहरे, उपविभागीय अभियंता (तत्कालीन कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, धुळे) यांची कनिष्ठ अभियंता या पदावर दि.२१.०५.१९९१ रोजी जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत नियुक्ती करण्यात आली होती. ग्राम विकास विभागाने श्री.बेहरे यांची ज्येष्ठता निश्चित करतांना दि.२१.०५.१९९१ ऐवजी नियमित नियुक्तीसाठी दि.०८.०३.१९९९ हा दिनांक दिला होता. श्री.बेहरे यांनी याविरोधात मा.प्रथम औद्योगिक न्यायालय, नाशिक येथे ULP No. २८५/९६ दाखल केली होती. सदर प्रकरणी मा.औद्योगिक न्यायालयाने श्री.बेहरे यांच्या हितार्थ निर्णय दिला होता. त्यानुसार ग्रामविकास विभागाने दि.०५.०१.२००५ रोजीचे आदेशामध्ये श्री.बेहरे यांना दि.२१.०५.१९९१ या नियुक्ती दिनांकास अनुसरुन त्यांची ज्येष्ठता निश्चित केली. तद्नंतर ग्राम विकास विभागाने त्यांच्या दि.२१.१२.२०१० रोजीच्या पत्रान्वये श्री.बेहरे यांना दिलेली ज्येष्ठता रद्द केली होती. त्यास श्री.बेहरे यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे मूळ अर्ज क्र. ४४/२०११ अन्वये आव्हानित केले होते. सदर प्रकरणात मा.न्यायाधिकरणाने दि.२४.०६.२०११ रोजी श्री.बेहरे यांच्या हितार्थ निर्णय दिलेला आहे. मा.न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णया विरोधात ग्राम विकास विभागाने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे पुनर्विलोकन याचिका क्रमांक २४०७/२०१३ दाखल केली होती. सदर पुनर्विलोकन याचिका दि.०३.०३.२०१४ रोजी फेटाळण्यात आलेली आहे. त्यामुळे मा.न्यायाधिकरणाने दि.२४.०६.२०११ रोजी श्री.बेहरे यांच्या हितार्थ दिलेला निर्णय कायम रहात आहे.

२. ग्राम विकास व जलसंधारण विभागाने दिनांक ९ मे, २०१८ रोजीच्या आदेशान्वये श्री.धर्मेंद्रकुमार ब. बेहरे, उपविभागीय अभियंता यांच्या सेवाज्येष्ठतेबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल मूळ अर्ज क्र.४४/२०११ प्रकरणात मा.न्यायाधिकरणाने दिनांक २४.०६.२०११ रोजी दिलेला निर्णय कायम राहिल्याने श्री.बेहरे यांना जिल्हा परिषद, धुळे येथे कनिष्ठ अभियंता या पदावर दि.२१.०५.१९९१ रोजी दिलेल्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठता निश्चित केलेली आहे.

३. जिल्हा परिषद कोटयातून पदोन्नत उपविभागीय अभियंता (पदवीधर) (स्थापत्य) व उपविभागीय अधिकारी (पदविकाधारक) (स्थापत्य) या संवर्गाची दिनांक १.१.२०१७ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठता-२०१७/ (९३/१७)/ आ(वर्ग-२), दिनांक १२ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

४. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेऊन व ग्राम विकास व जलसंधारण विभागाने दिनांक ९ मे, २०१८ रोजीच्या आदेशान्वये श्री.धर्मेंद्रकुमार ब. बेहरे, उपविभागीय अभियंता यांच्या सेवाज्येष्ठतेमध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियमावली, १९८२ मधील नियम क्रमांक ४(ब)(२) नुसार शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठता-२०१७/ (९३/१७)/ आ(वर्ग-२), दिनांक १२ ऑक्टोंबर, २०१७ मधील भाग-१ मध्ये यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्यानुसार श्री.धर्मेंद्रकुमार ब.बेहरे, उपविभागीय अभियंता यांची सुधारीत ज्येष्ठता या परिपत्रकाद्वारे निश्चित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्रमांक २०१८०५२४१७२१४३३२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

तसेच हे आदेश जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांची प्रत संबंधीतांनी उपलब्ध करुन घेवून पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vinayak Vishwanath Lawate

Digitally signed by Vinayak Vishwanath Lawate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb6e5bc7ae10ae9ecaa376fe734f5ee18589f6a42c0c82108b047be5703d1af3, serialNumber=81fd2869906a1aeee21da3e5d509f89daa03571d84025e4321bc9f87546c02a1, cn=Vinayak Vishwanath Lawate
Date: 2018.05.24 17:23:30 +05'30'

सहपत्र- परिशिष्ट “अ”

(विनायक लवटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१) प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) सचिव (जसंव्य व ला.क्षे.वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) सचिव, मृद व जलसंधारण, मंत्रालय, मुंबई
४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राद्वारे) *
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे
६) आयुक्त, मृद व जलसंधारण, वाल्मी, औरंगाबाद
७) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
८) श्री.धर्मेंद्रकुमार ब. बेहरे, उपविभागीय अभियंता, गिरणा पाटबंधारे उपविभाग, चाळीसगांव मार्फत मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
९) कार्यासन अधिकारी, आ(वर्ग-१)/आ(संनि)/आ(सअश्रे-२), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) आ (वर्ग-२) संग्रहार्थ.

शासन परिपत्रक क्रमांक एसएलएस -२०११/ (३४३/११)/ आ(वर्ग-२), दिनांक २४ मे, २०१८ चे सहपत्र										
परिशिष्ट - "अ"										
उप विभागीय अभियंता (स्थापत्य) (जि.प.संवर्ग) पदावरील ज्येष्ठता क्रमांक	अधिका-याचे नाव (श्री/श्रीमती)	जात प्रवर्ग	कनिष्ठ अभियंता पदावरील नियुक्तीचा दिनांक	जन्मदिनांक	उपविभागीय अभियंता पदावर पदोन्नतीचा दिनांक	नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/ पदोन्नतीने)	ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा मानीव दिनांक	सेवानिवृत्तीचा दिनांक	शैक्षणिक अर्हता	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
१२	शिरिष आनंदराव तट्टे	इ.मा.व.	१९.०५.१९९१	२१-०४-१९६६	०३-०७-२००१	पदोन्नतीने		३०-०४-२०२४	बी.ई. (स्था)	
१२-अ	धरमेंद्रकुमार बळवंत बेहरे	खुला (इमाव)	२१.०५.१९९१	२६-०२-१९६५	०२-०६-२००६	पदोन्नतीने		२८-०२-२०२३	बी.ई. (स्था)	श्री.बेहरे यांनी ग्राम विकास विभागाच्या दि.२१.१२.२०१० च्या पत्रास आव्हानित करुन त्यांना प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून म्हणजेच दि.२१.०५.१९९१ पासून सेवा ज्येष्ठता मिळण्यासाठी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण , मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे मूळ अर्ज क्र. ४४/२०११ अन्वये आव्हानित केले होते. सदर प्रकरणात मा.न्यायाधिकरणाने दि.२४.०६.२०११ रोजी श्री.बेहरे यांच्या हितात निर्णय दिलेला आहे. मा.न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णया विरोधात ग्राम विकास विभागाने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे पुनर्विलोकन याचिका क्रमांक २४०७/२०१३ दाखल केली होती. सदर पुनर्विलोकन याचिका दि.०३.०३.२०१४ रोजी फेटाळण्यात आलेली आहे. त्यामुळे मा.न्यायाधिकरणाने दि.२४.०६.२०११ रोजी श्री.बेहरे यांच्या हितात दिलेला निर्णय कायम रहात आहे. त्यास अनुसरुन ग्रा.वि.वि.चे आदेश क्र. जिपअ-२०१८/ प्र.क्र.२२/ आस्था-४, दिनांक ९ मे, २०१८ अन्वये श्री. डी.बी.बेहरे यांना कनिष्ठ अभियंता या पदावर दि.२१.०५.१९९१ या दिनांकास म्हणजेच प्रथम नियुक्ती दिनांकापासून सेवा ज्येष्ठता देण्यात आलेली आहे. श्री.बेहरे यांचे कनिष्ठ अभियंता पदावर नियुक्ती दिनांका २१.०५.१९९१ पासून सेवाज्येष्ठतेमध्ये स्थान निश्चित झाल्याने म.ना.से. (ज्येष्ठतेचे विनियम) नियमावली , १९८२ मधील नियम क्र.४ (२) (ब) नुसार श्री.बेहरे यांची उपविभागीय अभियंता (स्था.) (जि.प.) संवर्गात दि.१२.१०.१७ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम ज्येष्ठता यादीत भाग-१ मध्ये ज्येष्ठता क्रमांक २९ वर असलेल्या ज्येष्ठतेमध्ये सुधारणा होऊन त्यांची क्र.१२-अ वर ज्येष्ठता निश्चित करण्यात येत आहे.
१३	राजेंद्र शामराव शिंदे	खुला	२५.११.१९९१	२५-०८-१९६१	०३-०७-२००१	पदोन्नतीने		३१-०८-२०१९	बी.ई. (स्था)	